शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एचएमसीटी/ एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास, प्रवेशक्षमतेत वाढ व घट करण्यास तसेच नवीन पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना शासन मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः क्र.टीईएम -२०१३/प्र.क्र.१७७/तांशि-४**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
तारीख: १५ मे, २०१३.

वाचा —

१) १) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/२०१३/६०३,दिनांक ०८.०५.२०१३.

२) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक MIS-२०१२/(CR ६५)/TE-४, दिनांक २९.०१.२०१३

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक MIS-२०१३/(CR ८४)/TE-४,दिनांक २८.०३.२०१३.

## प्रस्तावना —

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरुअसलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र /एचएमसीटी/एमबीए/एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास, प्रवेशक्षमतेत वाढ व घट करण्यास तसेच नवीन पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय—

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एचएमसीटी/एमबीए/ एमसीए/पीजीडीएम महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास, सुरु असलेले अभ्यासक्रम बंद करण्यास आणि प्रवेशक्षमतेत वाढ व घट करण्यास तसेच नवीन पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट - १, २, ३, ४,५ व ६ मधील संस्थांना प्रवेशक्षमतेत वाढ व घट नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास, कमी केलेली प्रवेशक्षमता पूर्ववत करणे व नवीन पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेचे प्रवेक्षक्षमता वर नमुद केल्याप्रमाणे राहील.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्ययांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य विद्यापीठ अधिनियम,१९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षणयांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

६) सदर पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

७) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

८) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट,१९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया,नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

९) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

११) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१२) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

३. सर्व विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालकामार्फत)

४. सर्व संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

६. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.

८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.

९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई

१०. निवड नस्ती/तांशि-४

१३) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी विहित केलेल्या/करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

१४) या शासन निर्णयाद्वारे ज्या नवीन संस्थांना/अभ्यासक्रमांना अथवा अभ्यासक्रमातील प्रवेशक्षमता वाढीला मान्यता देण्यात आली आहे, अशा ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे किंवा वास्तुकला परिषदेकडे राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले आहेत व ज्यांना राज्य शासनाची नकारात्मक शिफारस आहे, अशा नवीन संस्थांना/अभ्यासक्रमांना/प्रवेशक्षमता वाढीला राज्य शासनामार्फत राबविण्यात येणारी फी-प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार नाही. या अटीनुसार संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

१५) ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५१६१६०९५०५१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Higher & Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Madan Maruti Morve
Date: 2013.05.17 17:03:59 +05'30'

**(म. मा. मोरवे)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय (सर्व), (संचालकामार्फत)

ANNEXURE - I

| SN | Permanent AICTE Application No | Institute Code | Institute Name | DistrictName | Course Level | Program | Course Name | Status | Shift | Gender Status | Course Start Year | Intake 2012-13 | Intake 2013-14 as on 10 th April 2013 approved by AICTE | Increase / Decrease in Intake for a.y. 2013-14 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 70 | 1-6758589 | 3223 | Mahatma Education Society's Pillai's College of HOCL College of Engineering & Technology, Rasayani via Panvel | Raigad | Post Graudate Degree Courses | Master of Engineering (M. E.) | Electronics and Telecommunication Engg | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 24 | 24 |
| 71 | 1-6758589 | 3223 | Mahatma Education Society's Pillai's College of HOCL College of Engineering & Technology, Rasayani via Panvel | Raigad | Degree Courses | Bachelor of Engineering (B. E.) | Automobile Engineering | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 60 | 60 |
| 72 | 1-7449581 | 3228 | SVKM's Dr. Bhanuben Nanavati College of Pharmacy, Mumbai | Mumbai-Suburban | Post Graudate Degree Courses | Master of Pharmacy | Pharmacology | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 18 | 18 |
| 73 | 1-17563481 | 3231 | Oriental College of Pharmacy , Navi Mumbai | Raigad | Post Graudate Degree Courses | Master of Pharmacy | Pharmacology | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 18 | 18 |
| 74 | 1-17563481 | 3231 | Oriental College of Pharmacy , Navi Mumbai | Raigad | Post Graudate Degree Courses | Master of Pharmacy | Quality Assurance | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 18 | 18 |
| 75 | 1-8395312 | 3235 | Gahlot Institute of Pharmacy, Koparkhairane, Navi Mumbai | Raigad | Post Graudate Degree Courses | Master of Pharmacy | Quality Assurance | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 18 | 18 |
| 76 | 1-3589664 | 3237 | Vivekanand Education Society's College of Pharmacy, Chembur, Mumbai | Mumbai-Suburban | Post Graudate Degree Courses | Master of Pharmacy | Pharmacutical Chemistry | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 18 | 18 |
| 77 | 1-17526123 | 3242 | The Shri Rishikesh Shikshan Prasarak Mandal, D.D.Vispute College of Pharmacy & Research Centre, Devad, New Panvel, Raiga | Raigad | Degree Courses | Bachelor of Pharmacy | Pharmacy | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2009 | 60 | 120 | 60 |
| 78 | 1-17526123 | 3242 | The Shri Rishikesh Shikshan Prasarak Mandal, D.D.Vispute College of Pharmacy & Research Centre, Devad, New Panvel, Raiga | Raigad | Post Graudate Degree Courses | Master of Pharmacy | Pharmaceutics | Un-Aided | Regular First Shift | Co-Education | 2013 | 0 | 18 | 18 |